

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील व्यवस्थापन शास्त्र प्रशाळे अंतर्गत एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या प्लेसमेंट माहितीपत्रकाचे अनावरण आज कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या हस्ते करण्यात आले. या माहितीपत्रकाच्या माध्यमातून एमबीएच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक व कौशल्यपूर्ण माहिती उद्योग क्षेत्रातील विविध कंपन्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

यावेळी बोलताना कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांना आगामी प्लेसमेंट ड्राइव्हसाठी शुभेच्छा दिल्या. उद्योग क्षेत्रात अधिकाधिक संधी मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने तयारी करावी, तसेच कौशल्य विकासावर भर द्यावा, असे मार्गदर्शन त्यांनी केले. विद्यापीठातून तयार होणारे विद्यार्थी हे उद्योग क्षेत्राच्या अपेक्षा पूर्ण करणारे असावेत, असेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाला व्यवस्थापन शास्त्र प्रशाळेच्या संचालिका प्रा. मधुलिका सोनवणे, प्लेसमेंट समन्वयक प्रा. आर. आर. चव्हाण तसेच प्लेसमेंट सेलचे समिती सदस्य उपस्थित होते.

एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेल्या या प्लेसमेंट माहितीपत्रकामुळे विविध उद्योग व कंपन्यांना विद्यार्थ्यांची सविस्तर माहिती उपलब्ध होणार असून त्यातून विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: ११ मार्च, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता